E-Sakal No.1 : 7.3 कोटी युजर्सचा विक्रम! मराठी डिजिटल विश्वात ई-सकाळ पुन्हा नंबर **1**

Top Marathi Digital News Platform: डिजिटल पत्रकारितेच्या स्पर्धात्मक विश्वात वेग, विश्वास आणि विश्लेषण यांचा संगम साधत eSakal.com ने पुन्हा एकदा इतिहास घडवला आहे. तब्बल 7.3 कोटी युजर्सचा टप्पा पार करत मराठी डिजिटल माध्यमांमध्ये ‘नंबर 1’ स्थान कायम राखले आहे.

E-Sakal No.1: डिजिटल पत्रकारितेच्या वेगवान शर्यतीत eSakal.com ने 7.3 कोटी युजर्सचा टप्पा गाठत पुन्हा एकदा ‘नंबर 1’ स्थानावर आपले वर्चस्व सिद्ध केले. कॉमस्कोर एमएमएक्स मल्टी-प्लॅटफॉर्म आकडेवारीनुसार ई-सकाळने स्पर्धकांपेक्षा लक्षणीय उंची गाठली असून, मराठी डिजिटल विश्वात आपले नेतृत्व अधिक भक्कम केले आहे.

वेगवान बातम्यांचा आढावा, सखोल विश्लेषण आणि विश्वासार्ह वार्तांकन यामुळे वाचकांची पहिली पसंती ई-सकाळला मिळत आहे. ग्रामीण भागातील स्थानिक प्रश्नांपासून ते जागतिक घडामोडींपर्यंत सर्वसमावेशक आणि संतुलित कव्हरेज देत आम्ही प्रत्येक वाचकापर्यंत पोहोचत आहोत.

बदलत्या डिजिटल युगात वाचनाच्या सवयी झपाट्याने बदलत असतानाही ई-सकाळचे वाचक तितक्याच आत्मीयतेने जोडलेले आहेत. वेबस्टोरी, शॉर्ट व्हिडिओ, लाईव्ह ब्लॉग, सोशल मीडिया अपडेट्स आणि मोबाईल-फ्रेंडली सादरीकरणामुळे तरुण पिढीशी आमची घट्ट नाळ जुळली आहे.

करिअर, शिक्षण, तंत्रज्ञान आणि स्पर्धा परीक्षा यांसारख्या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करून तरुणांसाठी उपयुक्त माहिती सातत्याने दिली जाते. मराठी भाषेच्या सामर्थ्यावर आणि वाचकांच्या भक्कम पाठिंब्यावर हे यश शक्य झाले.

वाचकांप्रती कृतज्ञता आणि नम्रता व्यक्त करत, नव्या उमेदीने आणि आत्मविश्वासाने अधिक चांगल्या प्रकारे बातम्या सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा निर्धार आहे.पुढील काळातही दर्जेदार, जबाबदार आणि लोकाभिमुख पत्रकारितेची परंपरा अधिक बळकट करण्यासाठी ई-सकाळ सज्ज आहे.